# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहमदनगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.७६** **विषय क्रमांक -७६**

दिनांक : ३०/०९/२०२४ विभाग :बांधकाम विभागः

**प्रस्तावाचा विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना (सन २०२४ - २५)अंतर्गत प्रस्तावित विकास कामास प्रशासकिय मान्यता मिळणेकामी प्रकल्प अहवाल सादर करणेबाबत..

---*---

**ठराव :-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना (सन २०२४ - २५)अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेस रक्कम रू.४,८५,६१,११०/- इतके अनुदान अनुज्ञेय आहे.

सदर योजनेअंतर्गत १७ कामे प्रस्तावित करणेत आलेली आहेत, त्यानुसार सुचविलेल्या कामाची मनपा स्तरावरील स्थळ पाहणी समितीने प्रत्यक्ष पाहणी करून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित करणेस शिफारस केलेली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून रक्कम रू.४,८५,५३,६७१/- इतका खर्च अपेक्षित असून सदर अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रवर्ग | अंदाजित मान्यता रक्कम |
|---|---|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील केदार वस्ती येथे बौध्द विहार समाज मंदिर बांधणे | ५०%पेक्षा जास्त | ३४९०००८ |
| २ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१० मध्ये रामवाडी अंतर्गत रस्ते व अंतर्गत सुविधा पुरविणे | अनुसुचित जाती | ७०००००० |
| ३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१० मधील सर्जेपूरा हरीजन वस्ती येथील सामाजिक सभागृहास संरक्षण भिंत सभागृह अंतर्गत विदयुत सेवा व उपकरणे पुरवणे, सभागृहाच्या परिसरात कॉंक्रिटीकरण, शौचालयाची व्यवस्था, वॉटर प्रफिंग व | ५०%पेक्षा जास्त | ३४९८८८४ |

| | | | |
|---|---|---|---|
| | सभागृह अंतर्गत विविध सेवा पुरवणे | | |
| ४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१० मधील गोकुळवाडी येथील सामाजिक शौचालयात व आसपासच्या परिसरात ३०० एम एम व्यासाची ड्रेनेज करणे | अनुसुचित जाती | ४८१२३२ |
| ५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१७ मधील दौंड रोड लगत विदया कॉलनी अंतर्गत रस्ते विकसित करणे | अनुसुचित जाती | ५९९९२९० |
| ६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६मध्ये सर्व्हे नं ४२४ +२-+४२६ ओपनस्पेस मध्ये बहुउद्देशीय हॉल बांधणे | अनुसुचित जाती (महिला) | ४३६६१९९ |
| ७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.११ मधील झेंडीगेट येथील मोचीवाडा येथील समाज मंदिर येथे शेड करणे | अनुसुचित जाती (महिला) | १९९९२४० |
| ८ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०८ मधील मनपा चे डॉ बाबासाहेब आंबेडकर वसाहत करिता भुमिगत गटर व्यवस्था करणे | अनुसुचित जाती (महिला) | ९४९००३ |
| ९ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१२ मधील दिपक वाईन्स ते हरिजन वस्ती येथील रस्ते विकसीत करणे | ५०% पेक्षा जास्त | १४९९०३५ |
| १० | छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बाबासाहेब आंबेडकर वसाहत पर्यत पथदिवे बसवणे व दुभाजक बसवणे | ५०% पेक्षा जास्त | ३४४०५३६ |
| ११ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नीलक्रांती चौक ढोर वस्ती येथे गटर व्यवस्था करणे | अनुसुचित जाती (महिला) | ४९९३६२ |
| १२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील शक्ती नगर केदार वस्ती सोलापुर रोड रस्ते विकसीत करणे | ५०% पेक्षा जास्त | २७५७१६० |
| १३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील रामवाडी शौचालय बांधणे | अनुसुचित जाती | १७९९५३० |
| १४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोठी येथे शौचालय बांधणे | ५०% पेक्षा जास्त | ३२८०००० |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१५ मधील दलित वस्ती संजय नगर अंतर्गत रस्ता ३०० एम एम एन पी २ आर सी सी गटर करणे | अनुसुचित जाती | ९९८९८१ |
| १६ | प्रभाग क्र.८ मध्ये टिपरे घर ते त्रिभुवन घर ते शिंदे घर, डहाळे घर ते गाडे घर ते जगताप घर ते पावडे घर , ४५० एम एम आर सी सी पाईप गटर व गांधीनगर अंतर्गत बोठे घर ते गाडेकर घर ते घोडके घर ते रणदिवे घर ते जगधने घर ते पुंड घर ते बुचडे घर ते आकडे घर ते शिंदे घर ते मोहोलकर घरापर्यत ३०० एम एम आर सी सी पाईप गटर करणे | अनुसुचित जाती (महिला) | ४९९५६९१ |
| १७ | प्रभाग क्र.६ मध्ये इंद्रप्रस्थ कॉलनी अंतर्गत आर सी सी पाईप गटर करणे | अनुसुचित जमाती (महिला) | १४९९५२० |
| | | एकुण = | ४,८५,५३,६७१/- |

सदर योजनेअंतर्गत प्रभाग क्र. १अ,७अ,८अ,९अ,११अ,१५अ,१६अ, व १७अ हे प्रभाग अनुसुवित जाती प्रवर्गरतहल असून याव्यतिरिक्त ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या असलेले प्रभागमध्ये आवश्यकतेनुसार कामे सुचविता येतील. सदर प्रस्तावित कामाबाबत पाहणी समितीने अहवाल दिलेला आहे.

तरी उक्त योजने अंतर्गत वर नमुद विकास काम करणेसाठी रक्कम रू.४,८५,५३,६७१/- (अक्षरी रक्कम रू.चार कोटी पंच्याएंशी लक्ष त्रेपन्नहजार सहाशे एक्काहत्तर मात्र) चा प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.जिल्हाधिकारी (न.पा.शाखा) अहमदनगर यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेस प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.तसेच रक्कम रू.एक कोटी पर्यत अतिरिक्त निधी मिळणार असल्याने त्यामधुन खाली नमूद कामे प्रस्तावित करावी.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | गांधीनगर प्र.क्र.८ या भागातील रोमन घर ते मकासरे घर, भोसले घर ते शिंदे घर, खरात घर ते शिंदे घर, पाचारणे घर ते गांधीनगर रोड पर्यत ३०० एम एम सिमेंटी गटर लाईन करणे वर गांधीनगर चोभे रो हौसिंग रोड ते आडसुळ घर ते मोरे घर शिंदे घर ते बोर्डे यांच्या घरापर्यत ४५० एम एम व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | ५०,००,०००/- |
| २ | बोल्हेगाव विशाल हनुमान नगर मुख्य अंतर्गत उभा मारूती मंदिर ते मकासरे घर ते कांबळे घर ते थोरात यांच्या घरापर्यत ४५० एम एम सिमेंट बंद पाईप गटर लाईन करणे (अंतर ३५० मीटर) | १७,५०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | गांधीनगर निसर्ग कॉलनी अंतर्गत ३०० एम एम सिमेंटी बंद पाईप गटर लाईन करणे. | १५,००,०००/- |
| ४ | गांधीनगर प्रभाग क्र. ८ आंबेडकर नगर चोभे रो हौसिंग अंतर्गत ३०० एम एम सिमेंटी ड्रेनेज लाईन टाकणे) | १७,५०,०००/- |
| | एकुण = | १००,००,०००/- |

वरिल कामे सदर योजनेतून प्रस्तावित करणेस प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णय:-**

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहमदनगर महानगरपालिका,

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहमदनगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक – २४ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.७७** — **विषय क्रमांक -७७**

दिनांक : ३०/०९/२०२४ — विभाग :घनकचरा व्यवस्थापन विभाग:

**प्रस्तावाचा विषय :-** बुरूडगाव स.नं.३४ येथील ५० मे. टन क्षमतेचा खत प्रकल्प अद्ययावत करून ९ महिन्यांकरिता चालविणेकामी देणेबाबतचे मे. मायोव्हेसल्स ॲन्ड मशीन्स प्रा.लि.यांचे पत्राबाबत

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केलेनुसार अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या बुरूडगांव सर्व्हे नं. ३४ येथे मा.शासन मान्य घनकचरा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) नुसार १०० मेट्रीक टन व ५० मे. टन खत निर्मिती करणारा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. पैकी प्रति दिन १०० मे.टन कच-यावर प्रक्रिया करून खत निर्मिती करणारा प्रकल्प हा उभारणे व उभारणीनंतर ५ वर्षे देखभाल दुरूस्तीसह चालविणेकामी मे. मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. औरंगाबाद या संस्थेस इन्पुट बेसीस रक्कम रूपये ५९० प्रति मे.टन या दराप्रमाणे तसेच निर्माण झालेल्या खतावर रक्कम रूपये १५ प्रति मे.टन या प्रमाणे मनपास रॉयल्टीसह देण्यात आलेला आहे. तसेच प्रति दिन ५० मे.टन कच-यावर प्रक्रिया करून खत निर्मिती करणारा प्रकल्प हा मे.आदर्श कंन्स्ट्रक्शन, पुणे या संस्थेस आउटपुट बेसीसवर रक्कम रूपये १९१५/- प्रति मे.टन व खत निर्मितीनंतर विक्री केलेल्या खतावर १० टक्के रॉयल्टी मनपास देणे या प्रमाणे १ वर्षाकरिता देखभाल दुरूस्तीसह चालविण्यास देण्यात आलेला होता.

तथापी मे.आदर्श कंन्स्ट्रक्शन पुणे या संस्थेने वर्षभरामध्ये मनपाने दिलेल्या दैनंदिन कच-यावर कुठल्याही प्रकारची प्रक्रिया केलेली नसून त्यांनी मुदत संपण्यापूर्वीच मनपास कुठल्याही प्रकारची पूर्व सुचना न देता संस्थेचे कर्मचारी घेवून प्रकल्प बेवारस अवस्थेत सोडून निघून गेले आहे. तसेच सदर संस्थेने प्रकल्प व प्रकल्पावरील यंत्र सामुग्रीचे नुकसान केलेले आहे. त्याबाबत सदर संस्थेस प्रकल्प पूर्ववत चालू अवस्थेत मनपास हस्तांतरीत करणे बाबत अंतिम नोटीस देखील बजावण्यात आलेली आहे. मे.मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर यांनी इकडेस पत्र देवून प्रतिदिन १०० मे.टन क्षमतेचा खत प्रकल्प व ५० मे.टन खत निर्मिती प्रकल्प असे दोन्ही प्रति दिन १५० मे.टन खत निर्मिती प्रकल्प देखभाल दुरूस्तीसह चालविणेची तयारी दर्शविलेली असून त्याप्रमाणे प्रशासक यांचेकडील मा.महासभा विषय क्र.२० ठराव क्र.६४ दि. ०२/०९/२०२४ अन्वये मे.मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर या संस्थेस सध्याच्या प्रक्रिया खर्च रूपये ५९०/- इनपुट

बेसीसवर व रॉयल्टी रक्कम रू.१५/- प्रती मे.टन दराप्रमाणे दि. २१/०५/२०२५ अखेर देखभाल दुरूस्तीसह चालविणे कामी देणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापी मे.मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. छत्रपती संभाजीनगर या संस्थेने दि. २६/०९/२०२४ रोजी पत्र देवून ५० मे.टन खत निर्मिती प्रकल्प ९ महिन्याकरीता दिलेला असून सदर प्रकल्प चालू करणेस साधारण रक्कम रू.१ कोटी २५ लाख खर्च येणार असून सदरचा खर्च ९ महिन्यामध्ये वसूल होणार नसून महानगरपालिका मालकीचे दोन्ही प्रकल्प दैनंदिन १०० मे. टन कच-यावर प्रक्रिया करून खत निर्मीती प्रकल्प व दैनंदिन ५० मे.टन कच-यावर प्रक्रिया करून खत निर्मीती प्रकल्प करणे असे दोन्ही मिळून दैनंदिन १५० मे.टन कच-यावर प्रक्रिया करून खत निर्मीती प्रकल्प देखभाल दुरूस्तीसह चालविणेकामी त्याचे संस्थेस निश्चीत केलेल्या रक्कम रू.५९०/- (इनपुट बेसीस) प्रति मे.टन दरामध्ये दरसाल ५ टक्के दरवाढ याप्रमाणे ७ + ३ असे एकुण १०वर्षाकरिता चालविणेस देण्यात यावा असे नमूद केलेले आहे.

मे.मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. या संस्थेच्या पत्राचा विचार करता दोन्ही प्रकल्प एकाच संस्थेस देखभाल दुरूस्तीसह चालविणेकामी दिल्यास मनपाचा निश्चीत फायदा होईल.दोन वेगवेगळया प्रकल्पाकरिता दोन संस्था नेमणे संयुक्तीक वाटत नाही, कामाचे स्वरूप एकच असल्यामुळे तसेच वाढते शहरीकरण व वाढती लोकसंख्या मुळे दैनंदिन निर्माण होणा-या कच-यामध्ये दिवसेंदिवस वाढ होणार असल्यामुळे कचरा निर्माण होणे बंद होणार नाही याकारणास्तव दोन्ही प्रकल्प एकाच संस्थेस देणे उचित राहिल. त्याप्रमाणे मे. मायोव्हेसल्स ॲन्ड मशीन्स प्रा.लि. या संस्थेने आज अखेर व्यवस्थित रित्या कामकाज केलेले आहे. तसेच सदर संस्था हि घनकचरा व्यवस्थापनाशी निगडीत असणा-या प्रकल्पांकरिता यंत्रसामुग्री बनविणारी संस्था आहे. मनपाच्या दोन्ही प्रकल्पामध्ये काही तांत्रिक बिघाड तसेच लागणारी यंत्रसामग्री स्वखर्चाने तात्काळ उपलब्ध करून घेवू शकते. त्यामुळे प्रकल्प कायम सुरू राहील व कच-यावर प्रक्रिया होणे कायम सुरू राहील.

तथापी मायोव्हेसल्स अँड मशीन्स प्रा.लि. संस्थेने प्रक्रियेअंती निर्माण होणा-या खत विक्रीवर मनपास देण्यात येणा-या रॉयल्टी बाबत पत्रामध्ये उल्लेख केलेला नाही. परंतु निर्माण होणा-या खतावर रू.२०/- प्रती मे.टन याप्रमाणे वाढीव रॉयल्टी आकारणे उचित राहील तसेच संस्थेसोबत झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती नमुद करून संस्थेच्या पत्रानुसार त्यांना पुढील एकुण ७+३ वर्षे कालावधीकरिता प्रती वर्ष ५% दरवाढीसह दोन्ही खत निर्मिती प्रकल्प देखभाल दुरूस्तीसह चालविणेकामी देणेकामी निर्णय घेणे उचित होईल. सदरची बाब धोरणात्मक स्वरूपाची असल्यामुळे मा.महासभेची मंजूरी घेणे अवश्यक आहे.

१.प्रर्कियेअंती आर.डी.एफ.मटेरियलवर रू.२०/- प्रती मे.टन रॉयल्टी मनपास देणे बंधनकारक राहील.तसेच मनपा दरमहा अदा करण्यात येणा-या देयकातून वसूल करेल.

२.सर्व प्रकारचे आर.डी.एफ. मटेरियलचे वजन केले जाईल (डेपोमधून बाहेर जाणारे मटेरियल) ते संस्थेवर बंधनकारक राहील.

३.प्रक्रियेअंती निर्माणू होणारे खताची स्वतंत्र नोंदवही ठेवून दरमहा निर्माण होणा-या खताची नोंद ठेवून सदर नोंद मनपास दरमहा देयक सादर करताना देणे बंधनकारक राहील.

४.निर्माण झालेले खत खरेदी करणा-या सर्व व्यक्ती, संस्था यांची संपूर्ण नोंद ठेवून त्याचा दरमहा तपशील मनपास सादर करणे बंधनकारक राहील.

५.बुरूडगाव स.न.३४ येथील खत निर्मिती प्रकल्पावरील मशिनरी नादुरूस्त झाल्यास सदर मशिनरी डेपोच्या बाहेर न्यावयाची झाल्यास मनपाच्या लेखी पूर्व परवानगी शिवाय नेण्यात येणार नाही.

मे.मायोव्हेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. या संस्थेचा कामाचा पूर्वानुभव लक्षात घेता तसेच सदर संस्थेचे कामकाज समाधान कारक असल्याने दि.२१/०५/२०२५ पासून १०० मे.टन कचरा प्रक्रिया प्रकल्प व ५० मे.टन कचरा प्रक्रिया प्रकल्प देखभाल दुरूस्तीसह चालविणेकामी प्रती मे.टन रक्कम रू.५९०/- दराप्रमाणे वरिल अटी व शर्तीनुसार दि.२१/०५/२०२५ ते २०/०५/२०२६ पर्यत देणेस व पुढील प्रत्येक वर्षी ५% दरवाढ करून सदर दोन्ही कचरा प्रक्रिया प्रकल्प दि.२०/०५/२०२६ ते दि.१९/०५/२०३० पर्यत देणेस मंजूरी देण्यात येत आहे. तसेच प्रक्रियेअंती निर्माण होणा-या खत विक्रीवर मनपास देण्यात येणा-या सध्याच्या रॉयल्टीचा दर रू.१५/- ऐवजी रक्कम रू.२०/- प्रमाणे करणेस प्रशासक सर्व साधारण सभा मान्यता देत आहे.

**निर्णयः-**

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहमदनगर महानगरपालिका,